# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | प्रेसनोट | 2023<br>दिनांक १५.०१.२०२३ |
|---|---|---|

## ४८ तासाच्या आत कोपरखैरणे पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ६२/२०२३ भादवि कलम ३०२, २०१ मधील आरोपीस मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांनी केली अटक

---

दिनांक १२/०२/२०२३ रोजी १८.३० वा. कांचनगंगा सोसायटीच्या विरुध्द बाजुस असलेल्या नाल्यालगत खाडीकडे जाणाऱ्या अरुंद रोडच्या डाव्याबाजुच्या झाडाझुडपामध्ये एका तळयापासुन १०० मि. अंतरावर कोपरखैरणे, नवी मुंबई येथे ३५ ते ४० वर्ष वयाच्या अनोळखी महिलेची अज्ञात व्यक्तीने तिच्या ओढणीने गळा आवळुन खुन करुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह खाडीमध्ये ढकलुन दिला म्हणुन कोपरखैरणे पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ६२/२०२३ भादवि कलम ३०२, २०१ दि. १३/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नमुद गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार करत होते. गुन्हयातील अनोळखी मयत महिला हिचा संपुर्ण महाराष्ट्र मधील पोलीस ठाणेमध्ये वरील गुन्हयातील वर्णनाची महिला मिसींगबाबत चौकशी करीत असताना, मुंबई पोलीस आयुक्तालयातील ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे मोठे मनुष्य मिसिंग क्र. २१/२०२३ मधील नोंद असलेली महिला हिचे वर्णन व नमुद गुन्हयातील मयत महिलेचे वर्णनामध्ये साम्य असल्याचे दिसून आले. मिळालेल्या माहितीची शहानिशा करण्याकरीता पोलीस उपनिरीक्षक प्रताप देसाई, पोहवा/सरफरे व पोहवा/कदम यांना प्रत्यक्ष ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे जावून नमुद मिसिंग देणारे महिलेचे पती मो. अकिल फकीर मोहमंद हाशमी याच्याकडे चौकशी केली असता नमुद मिसिंग मधील महिला ही त्यांची पत्नी असल्याचे सांगून तिचे नाव सायदा बानु हासमी वय ३३ वर्षे, व्यवसाय- सफाई कामगार, रा. भिमनगर रहिवाशी सेवा संघ महाराष्ट्र नगर मानखुर्द मुंबई ८८ असे असल्याचे सांगितले. चौकशी दरम्यान सदरची महिला ही जुईनगर येथे हाउस किपिंगचे काम करीत असल्याचे खबर देणार मयत यांचे पतीकडून समजले व मयत महिलेचा मोबाईल प्राप्त करण्यात आला.

त्या अनुषंगाने गुन्हयात जलद गतीने तपासाचे चक्र फिरवून तांत्रिक तपास करुन काही संशयीत इसमांचे नंबर मिळविण्यात आले. त्यामधील संशयीत मो.क्र. ९५१९०५७९९३ नामे **राजकुमार बबूराम पाल वय ४० वर्षे धंदा - वॉचमन सध्या राह. कौसीका सोसायटी वॉचमन रूम से. २९ वाशी नवी मुंबई मुळ राह. मु. खरका खास पो. खीरी ता. कोराव, जारी, इलाहाबाद जरी बाजार उत्तरप्रदेश** याचा असल्याचे निष्पन्न झाले. त्याचा मागोवा घेवून त्यास कौसीका सोसायटी, से. २९, वाशी येथून शिताफिने ताब्यात घेवून त्याच्याकडे गुन्हयातील मयत महिला तसेच गुन्हयाचे अनुषंगाने तपास करता त्याने मयत महिला नामे सायदा बानु हासमी वय ३३ वर्षे, व्यवसाय - सफाई कामगार, रा. भिमनगर रहिवाशी सेवा संघ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द, मुंबई ८८ हिस तिने लग्नाचा तगादा लावल्याने तिचा ससेमिरा सोडविण्याकरीता तिला कांचनगंगा सोसायटीच्या समोरील नाल्यालगत, खाडीकडे जाणा-या अरुंद रोडच्या डाव्या बाजूला, झाडाझुडपामध्ये कोपरखैरणे, नवी मुंबई येथे भेटण्यास बोलावून जिवेठार मारले बाबत गुन्हयाची कबूली दिली आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, मा. पोलीस सह आयुक्त श्री. संजय मोहिते, मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री. महेश घुर्ये, गुन्हे शाखेचे मा. पोलीस उप आयुक्त श्री अमित काळे व सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विनायक वस्त, गुन्हेशाखा यांच्या मार्गदर्शनाखाली, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि विश्वनाथ कोळेकर, पोउपनि/प्रताप देसाई, पो.हवा. आतिश कदम, पो.हवा. सतिश सरफरे, पो.हवा. महेश पाटील, पो.हवा. अनिल यादव यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

★★★★★★★★★★